प्रकरण तिसरे :

# हमालांच्या व्यवसायाचे स्वरुप व कौटुंबिक जीवन

## प्रकरण तिसरे

## हमालांच्या व्यवसायाचे स्वरूप व त्यांचे कौटुंबिक जीवन

हमालांना लाभलेली आर्थिक दारिद्र्याची पार्श्वभूमी, निरक्षरता अथवा मर्यादित शिक्षण यामुळे हे लोक औद्योगिक केंद्राकडे रोजगाराच्या शोधार्थ वळतात. औद्योगिक - व्यापारी क्षेत्रातील शारीरिक कष्टाच्या कामामध्ये प्रवेश करतात. हमाली हा त्यापैकीच एक रोजगार हमाली व्यवसायामध्ये आल्यानंतर, त्यांच्या आर्थिक व कौटुंबिक जीवना मध्ये झालेला बदल अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. या दृष्टीकोनातूनच हमालांच्या व्यवसायाचे स्वरूप व कौटुंबिक जीवन अभ्यासताना हमालांचा व्यवसाय प्रवेश व व्यवसाय प्रवेशाचे कारण, हमाली कामाचे स्वरूप, त्यामधील समस्या व अनुभव, हमालांचे मासिक उत्पन्न, त्यांना मिळणा-या सुविधा व सवलती, त्यांच्या व्यसनाधीनतेचे प्रमाण आणि कौटुंबिक जीवन याविषयीचे विवेचन केले आहे.

### १. व्यवसाय प्रवेश :

हमाली कामामध्ये वयाची निश्चित मर्यादा नाही. शारीरिक कष्टाचे काम असल्याने शरीर साथ देईपर्यंत हमाल या व्यवसायात राहतात. उतार वयामध्ये हमाल काम सोडून देतात, हे हमालांच्या वयोगटानुसार वर्गीकरणामधून स्पष्ट झाले आहे. म्हणून हमालांनी व्यवसायात कोणत्या वयात प्रवेश केला, हे अभ्यासणे सुद्धा गरजेचे ठरते. बहुतांशी हमाल तारूण्यातच हमाली व्यवसायामध्ये प्रवेश करतात. सारणी क्र. १ हमालांनी व्यवसायात प्रवेश केलेल्या वयानुसार प्रमाण दर्शविते.

सारणी क्र. १ - प्रतिसादकांनी व्यवसायात प्रवेश केलेल्या वयानुसार वर्गीकरण

| विभाग | १५ पर्यंत | १६ ते २० | २१ ते २५ | २६ ते ३० | ३१ ते ३५ | ३६ च्या पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहतुक | १<br>[२. २२%] | १३<br>[२८. ८८%] | १४<br>[३१. ११%] | ८<br>[१७. ७७%] | ९<br>[२०%] | – | ४५<br>[१००%] |
| कृषी-उत्पन्न विनिमय | २<br>[४. ७६%] | २१<br>[५०%] | १२<br>[२८. ५७%] | ५<br>[११. ९०%] | २<br>[४. ७६%] | – | ४२<br>[१००%] |
| धान्यबाजार | २<br>[५. २६%] | २१<br>[५५. २६%] | ८<br>[२१. ०५%] | ६<br>[१५. ७८%] | – | १<br>[२. ६३%] | ३८<br>[१००%] |
| एकूण | ५ [४%] | ५५ [४४%] | ३४ [२७. २%] | १९[१५. २%] | ११[८. ८%] | १ [०. ८%] | १२५ [१००%] |

हमालांच्या वयानुसार व्यवसाय प्रवेशाचा आढावा घेता १६ ते २० वयोगटामध्ये व्यवसाय प्रवेश करणारे हमाल अधिक होते. एकूण हमालांपैकी ५५ [४४ टक्के] हमालांनी १६ ते २० वया दरम्यान व्यवसाय स्वीकारला आहे. त्यानंतरच्या पुढील प्रत्येक वयोगटामध्ये व्यवसाय प्रवेश करणाऱ्या हमालांचे प्रमाण कमी आढळते. वयाच्या ३१ वर्षानंतर व्यवसायात येणारे हमाल फारच थोडे होते. ३१ ते ३५ वया दरम्यान ११ [८.८ टक्के] हमालांनी व्यवसाय प्रवेश केला आहे. पस्तीशीनंतरही व्यवसायात पदार्पण करणारे केवळ एक अपवादात्मक उदाहरण मिळाले. संपूर्ण वर्गीकरणाचा विचार करता, १६ ते २५ वयाच्या दरम्यान हमाली-मध्ये येणारे प्रतिसादक सर्वाधिक आहेत. ८९ [७१.२ टक्के] हमालांनी वयाच्या १६ ते २५ दरम्यान व्यवसाय प्रवेश केला आहे. व्यवसायामधील काम व वेतन यांची अस्थिरता आणि शारीरिक कष्टाचे काम असल्याने वयाच्या ३० वर्षानंतर व्यवसाय पत्करणारे हमाल कमी आढळतात. व्यवसाय प्रवेश वर्गीकरणाचा विभागवार आढावा घेता वाहतूक विभागा-मध्ये हा क्रम आढळत नाही. याचे कारण, वाहतूक विभागामध्ये कामाची व वेतनाची बऱ्यापैकी शाश्वती असते. हमाली व्यवसायामध्ये प्रवेश करण्यापूर्वी बहुतांशी हमालांनी फिरती हमाली केल्याचे आढळते. तसेच, व्यवसायात येण्यापूर्वी हॉटेल, चहा गाडयावर कामगार, बांधकामावर मजूर म्हणून काम केल्याचे हमालांच्या मुलाखतीमधून प्रतिपादन करण्यात आले.

## २. व्यवसाय प्रवेशाचे कारण :

हमाली व्यवसायामध्ये स्थलांतरीत हमालच अधिक आढळतात. त्यांच्या आर्थिक पार्श्वभूमीच्या व स्थलांतराच्या पार्श्वभूमीचा वेध घेता सर्वच हमाल एका समान आर्थिक परिस्थितीतून आलेले आढळतात. पुढील

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सारणी क्र. २ व्यवसाय प्रवेशाच्या कारणांनुसार वर्गीकरणाचा निर्देश करते.

सारणी क्र. २ - प्रतिसादकांचे व्यवसाय प्रवेशाच्या कारणांनुसार वर्गीकरण

| विभाग | अल्पभूधारकता | भूमीहीनता | दुष्काळ | भांडवलाचा अभाव | व्यवसाय सुरक्षितता | शिक्षणाचा अभाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहतुक | २० [४४.४४%] | १३ [२८.८८%] | ११ [२४.४४%] | - | - | १ [२.२२%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न-विनिमय | २५ [५९.५२%] | ८ [१९.०४%] | ३ [७.१४%] | ५ [११.९०%] | - | १ [२.३८%] | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | २१ [५५.२६%] | ७ [१८.४२%] | २ [५.२६%] | १ [२.६३%] | ५ [१३.१५%] | २ [५.२६%] | ३८ [१००%] |
| एकूण | ६६ [५२.८%] | २८ [२२.४%] | १६ [१२.८%] | ६ [४.८%] | ५ [४%] | ४ [३.२%] | १२५ [१००%] |

सारणी क्र. २ वरून व्यवसाय प्रवेशाची मिमांसा खालील प्रमाणे स्पष्ट केली आहे.

[१] अल्पभूधारकता :

हमालांमध्ये बहुतांशी हमाल हे अल्पभूधारक आढळतात. आर्थिक पार्श्वभूमीच्या विश्लेषणामधून असे स्पष्ट होते की भूधारक हमालांचे प्रमाण ७६.८ टक्के असले तरी सर्वच हमाल अल्पभूधारक होते. ४० टक्के हमालांची शेतजमीन २ एकर अथवा २ एकरच्या आतील आहे. ३३.६ टक्के हमालांची शेतजमीन ३ ते ५ एकरच्या दरम्यान आहे. हमालांशी चर्चा करता असे आढळले की, अल्पभूधारकांपैकी ६२ [५२.८%] हमालांचे व्यवसाय प्रवेशाचे कारण अल्पभूधारकता आहे. कारण असलेली शेतजमीन जिराईती, मुरमाड, कोरडवाहू व डोंगराळ अशा स्वरूपाची आहे. त्यामुळे या शेतीतून घेतली जाणारी पिके ही पूर्णत: पावसावर अवलंबून असतात. पाणीपुरवठयाच्या सोयींच्या अभावामुळे शेती ही ऋतूमानाच्या लहरीवर अवलंबून असते. साहजिकच शेती उत्पन्न हे बेभरवशाचे असते. हमालांच्या शेतीमधील मासिक उत्पन्नाचा आढावा घेता याची प्रचिती येते. ६०.७० टक्के कुटुंबांचे मासिक उत्पन्न ३०० रु. किंवा त्यापेक्षा कमी आढळते. केवळ ३.१२ टक्के कुटुंबाचे उत्पन्न ६०० रु. होते. यावरून स्पष्ट होते की, सर्वच हमालांचे शेतीमधील उत्पन्न अत्यल्प होते. या अत्यल्प उत्पन्नामुळे चरितार्थासाठी नवा रोजगार शोधणे आवश्यक ठरले. त्यामुळे हमाली व्यवसायात अल्पभूधारक व भूमीहीन आढळतात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

UNIVERSITY ... ५५/- LIBRARY KOLHAPUR

[२] भूमिहीनता :

हमाली व्यवसायामध्ये भूमिहीन हमाल सुद्धा मोठया प्रमाणात आढळतात. हमाली व्यवसाय पत्करण्याच्या कारणापैकी भूमिहीनता हे एक महत्वाचे कारण आहे. पाहणीपैकी २८ [२२.४ टक्के] हमालांचे व्यवसाय प्रवेशाचे कारण ते भूमिहीन आहेत. हे हमाल अवर्षणग्रस्त व कोरडवाहू प्रदेशामधून स्थलांतरीत झाले आहेत. त्यामुळे भूमिहीन लोकांना शेतीवर आधारित रोजगार मोठया प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाही. त्याप्रमाणेच हमाल ज्या प्रदेशामधून स्थलांतरीत झाले आहेत ते प्रदेश औद्योगिकदृष्टया अविकसित आहेत. त्यामुळे औद्योगिक व व्यापारी क्षेत्रामधून रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता कमी असते.

[३] दुष्काळ :

भूधारक हमालापैकी काही हमाल हे महाराष्ट्र राज्यातील सोलापूर, उस्मानाबाद व सांगली, तसेच कर्नाटक राज्यातील बेळगांव व विजापूर जिल्हयातील आहेत. या प्रदेशामधील नेहमीचाच दुष्काळ ही एक मोठी समस्या आहे. दुष्काळामुळे स्थलांतरीत झालेले व हमाली व्यवसायात आलेल्यांचे प्रमाण १६ [१२.८ टक्के] आहे. सोलापूर, उस्मानाबाद व सांगली हया तिन्ही जिल्हयाचा बराचसा भाग हा अवर्षणग्रस्त प्रदेश म्हणून ओळखला जातो. तसेच कर्नाटक राज्यामधील बेळगाव जिल्हयातील चिकोडी तालुक्याचा भाग व विजापूर जिल्हा हे अवर्षणग्रस्त प्रदेश आहेत. त्यामुळे हया सर्वच प्रदेशातील लोकांना दुष्काळाला सातत्याने तोंड दयावे लागते.

[४] भांडवलाचा अभाव :

हमालांच्या मुलाखतीमधून स्थलांतराचे व व्यवसाय प्रदेशाचे आणखी एक कारण दिसून येते, की स्वयंरोजगारासाठी भांडवलाचा अभाव असल्याने हमाली स्वीकारली. अशा हमालांचे प्रमाण ६ [४.८%] आहे. हमालांची लघुउद्योग अथवा कुटीरोद्योगासारखे स्वयंरोजगार करण्याची इच्छा दिसून आली. परंतु शेतीमधून मिळणारे अल्प उत्पादन तसेच कुठल्याही स्वरूपाची स्थावर मालमत्ता नसल्याने स्वयंरोजगारासाठी भांडवल उभे करणे हमालांना शक्य होत नाही. त्यामुळे हमाली हा पर्याय स्वीकारला जातो.

[५] व्यवसाय सुरक्षितता :

धान्यबाजारामधील स्त्री हमालांच्या बाबतीत मात्र वेगळे कारण दिसून येते. स्त्रियांचे वेतन कमी व असमान असले तरी त्या व्यवसायात टिकून आहेत. धान्यबाजारमधील स्त्री हमाल सहकारी बझारमध्ये काम करतात. त्यामुळे एकाच ठिकाणी असलेले काम त्यांना स्त्री या दृष्टिकोनातून सुरक्षिततेचे वाटते. व्यवसायामधील सुरक्षितता हे धान्यबाजारमधील स्त्री हमालांचे व्यवसाय स्वीकारण्याचे प्रमुख कारण आहे. एकूण हमालांशी त्यांचे प्रमाण ५ [४ टक्के] आहे.

[६] शिक्षणाचा अभाव :

हमालांमध्ये निरक्षरता अथवा मर्यादित शिक्षण हा एक महत्वाचा गंभीर प्रश्न आहे. परंतु शिक्षणाचा अभाव असल्याने हमाली

व्यवसाय स्वीकारणारे हमाल केवळ ४ [३.२ टक्के] आढळते. ह्या हमालांचे माध्यमिक [१०वी] शिक्षण पूर्ण झाले आहे. हमालीमध्ये येण्याची इच्छा नसताना मर्यादित शिक्षण तसेच इतर कौशल्याचा अभाव यामुळे शारीरिक कष्टाचे काम पर्याय म्हणून स्वीकारल्याचे आढळते.

थोडक्यात, अल्पभूधारकता व शेती मधील अल्प उत्पन्न, भूमिहीनता, दुष्काळ, स्वयंरोजगारासाठी भांडवलाचा अभाव आणि निरक्षरता ही हमालांच्या व्यवसाय स्वीकृतीची सामान्य कारणे म्हणून सांगता येतील. तसेच हमालांच्या मुलाखती मधून आणखी एक बाब स्पष्ट होते की, इतर मजूरी कामांपेक्षा हमालीमध्ये वेतन अधिक मिळते, हे एक व्यवसाय स्वीकृतीचे कारण आहे.

## ३. हमाली कामाचे स्वरूप :

हमाली व्यवसायामध्ये कामाच्या स्वरूपावरून प्रमुख दोन प्रकार पडतात : [१] छकडयाच्या व हातगाडीच्या साहाय्याने मालाची ने-आण करणे, आणि [२] डोक्यावरून अथवा पाठीवरून ओझी वाहण्याचा. कोल्हापूर शहरामध्ये छकडयाच्या साहाय्याने मालाची ने-आण करणारे हमाल अल्प आहेत. त्यांची संख्या सुमारे ५० आहे. तसेच हातगाडीने हमाली करणारे सुमारे २०० आहेत. परंतु कोल्हापूर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाकडे त्यांची नोंद झालेली नसल्याने त्यांचे हमालीचे दर निश्चित नसतात. डोक्यावरून अथवा पाठीवरून ओझी वाहण्याच्या हमाली कामामध्ये सुद्धा कामाच्या दरावरून दोन

प्रकार पडतात. एक, फाळक्यापर्यंत मालाची ने-आण करणारे हमाल व दुसरा प्रकार, फाळक्यापासून ट्रकमध्ये मालाची ने-आण करणाऱ्या हमालांचा. यांना अनुक्रमे माथाडी कामगार व वारणी कामगार म्हणतात. माथाडी कामगारांचे कामाचे दर हे नगावर ठरलेले असतात, तर वारणी कामगारांचे दर हे टनावर ठरलेले असतात. परंतु त्यांच्या एकूण वेतनाची विभागणी समपातळीवर केली जाते. पाहणी केलेले हमाल सुद्धा हया दोन्ही प्रकारामधील आढळले. त्यांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे -

सारणी क्र. ३ - प्रतिसादकांचे कामाच्या प्रकारानुसार वर्गीकरण

| विभाग | माथाडी कामगार | वारणी कामगार | एकूण |
|---|---|---|---|
| वाहतूक | ३० [६६. ६६%] | १५ [३३. ३३%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न-विनिमय | २८ [६६. ६६%] | १४ [३३. ३३%] | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | २६ [६८. ४२%] | १२ [३१. ५७%] | ३८ [१००%] |
| एकूण | ८४ [६७. २%] | ४१ [३२. ८%] | १२५ [१००%] |

पाहणी केलेल्या १२५ हमालांपैकी ८४ [६७. २ टक्के] हमाल हे माथाडी कामगार होते, तर ४१ [३२. ८ टक्के] हमाल वारणी कामगार होते.

हमाली कामाच्या स्वरूपानुसार कामाचे अनेक प्रकार पडतात. उतराई, भराई, तोलाई, गट लावणे, थप्पी लावणे आणि परताई असे हमाली कामाचे प्रकार आहेत. माल वाहनातून उतरण्याला उतराई म्हणतात. गट लावणे या कामात वेगवेगळ्या दर्जाप्रमाणे मालाची विभागणी केली जाते. नंतर गुदामामध्ये त्यांच्या दर्जानुसार थप्पी लावली जाते. परताई याचा अर्थ एका पोत्यातून दुसऱ्या पोत्यात माल भरणे. सामान्यत: तिन्ही विभागातून कामाचे स्वरूप सारखेच आहे. केवळ गूळ विभागामध्ये ढेपांवर पोती शिवणे व शिक्के मारणे, दोरी रंगविणे अशी वेगळ्या स्वरूपाची कामे आहेत तसेच, धान्यबाजारमध्ये काम करणाऱ्या स्त्री हमालांचे काम सुद्धा पूर्णत: भिन्न स्वरूपाचे आहे. धान्यबाजारमधील स्त्रिया ओझी उचलण्याच्या कामाऐवजी माल निवडणे, स्वच्छ करणे, मालाचे वजन करून किलोचे पॅकिंग करणे आणि पॅकिंगवर दर व इतर नोंदी करणे अशा स्वरूपाचे काम करतात. सर्वसाधारणपणे एकावेळेस हमाल किमान ५० किलो व जास्तीत जास्त १५० किलो वजन उचलतो. सर्व विभागामधून वजनाबाबतच्या मर्यादा ह्याच आहेत. केवळ गूळ विभागामध्ये जास्तीत जास्त ३५ किलोची ढेप एकावेळी उचलली जाते. धान्यबाजारमध्ये धान्य, कडधान्य इत्यादींचा विनिमय-व्यवहार होतो. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागामध्ये कांदा, बटाटा, मिरची, भाजीपाला, गूळ इत्यादींचा विनिमय व्यवहार होतो, तर वाहतूक विभागामध्ये धान्य-बाजार व कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील सर्व वस्तू, तसेच लोखंड, सळी, सिमेंट, चुना, कोळसा, खत, तेल, औषधे, कापड इत्यादी वस्तूंची आवक-जावक होते.

हमालांच्या कामाच्या स्वरूपाबाबत अधिक माहिती संकलित करताना हमालांच्या कामाची वेळ, बेकारीचे प्रमाण, कामावर नेमून घेण्याबाबतची व कमी करण्याबाबतची निर्णय पद्धती, व्यवसाय अनुभव आणि मालकांची वागणूक इत्यादीविषयी माहिती घेतली. ती पुढील प्रमाणे -

[अ] कामाची वेळ :

कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, हमाल प्रतिनिधी आणि व्यापारी प्रतिनिधी यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार धान्यबाजार व वाहतूक विभागातील हमाली कामाची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ७ पर्यंत ठरली आहे. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील कामाची वेळ ठरविण्यास व्यापारी प्रतिनिधींनी नकार दर्शविल्याने कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील कामाची वेळ निश्चित होऊ शकली नाही.

वरील प्रमाणे कामाच्या वेळा ठरल्या असल्यातरी याची अंमलबजावणी होतेच असे नाही. हमालांच्या मुलाखतीमधून स्पष्ट होते की फारच थोडया ठिकाणी कामाच्या वेळेचे बंधन पाळले जाते. बहुतांशी ठिकाणी हमालांच्या कामाची वेळ सकाळी ९ ते सायंकाळी ७ असते. परंतु याही वेळेबाबत निश्चितता नाही. सामान्यत: संध्याकाळी ७ला काम संपत असले तरी प्रत्यक्षात हातात घेतलेले काम पूर्ण होईपर्यंत हमालांना काम करावे लागते. माल भरून येणारी व जाणारी वाहने, मालगाडी [वॅगन] यांच्या लहरीवर हमालांच्या

कामाची वेळ अवलंबून असते. धान्यबाजार, वाहतूक या विभागापेक्षा कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील गूळ बाजारामध्ये वेगळी परिस्थिती आढळते. काही गूळ बाजारातील, गुदामातील हमालांना रात्री ९ ते पहाटे ३ पर्यंत काम करावे लागते. यामध्ये तीन स्त्रियादेखील आढळून आल्या.

कामाच्या वेळेप्रमाणेच एकूण कराव्या लागणा-या कामांचे तास पाहता सामान्यत: हमालांना दिवसातील ६ ते ८ तास काम करावे लागते. अपवादात्मक काही ठिकाणी दिवसातील चार तास हमाल काम करतात. ज्या ठिकाणी वस्तू, माल इत्यादीची आवक-जावक कमी असते, त्याठिकाणी हमालांना काम कमी असते, अर्थात् त्याचा परिणाम त्यांच्या वेतनावर सुद्धा होतो.

[ब] हंगामी काम :

हमालांमध्ये आर्थिक दुर्बलतेचे मूळ कारण वेतनाबरोबरच उपलब्ध होणारे काम हे एक आहे. हमालांच्या बाबतीत काम न मिळणे अथवा कमी मिळणे ही नेहमीचीच समस्या आहे. हमालांचे काम नियमित स्वरूपाचे नसते. कामाची शाश्वती देता येत नाही. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागामधील ४२ [३३.६ टक्के] व धान्यबाजारमधील ३८ [३०.४ टक्के] हमालांना हंगामी काम मिळते. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागामधील काम ब-याच अंशी हंगामी स्वरूपाचे असते. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागामध्ये कांदा, बटाटा, मिरची, गूळ इत्यादीची आवक-जावक होत असते. त्यामुळे या मालाच्या उत्पादनाप्रमाणे हमाली कामातील बेकारी अवलंबून असते. ही पिके व गूळासारखे उत्पादन पूर्णत: हंगामी स्वरूपाचे असल्याने कृषि-उत्पन्न-

विनिमय विभागातील काम हंगामी स्वरूपाचे असते. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील हमालांना वर्षातील पाच-सहा महिने काम उपलब्ध होऊ शकत नाही. एक महिन्याचा आढावा घेता असे दिसून आले की, महिन्यातील किमान सहा दिवस काम मिळू शकत नाही. धान्यबाजार विभागामध्ये महिन्यातील ८ ते १२ दिवस हमालांना कामाशिवाय बेकार रहावे लागते. हंगामी बेकारीचा प्रश्न धान्यबाजारमध्ये सुद्धा जाणवतो. सामान्यत: पावसाळ्यातील दोन-तीन महिने काम मिळू शकत नाही. अथवा काम मिळाले तरी मालाची-धान्याची आवक-जावक कमी असते. परिणामी मिळणारी मजूरी कमी असते. धान्य-बाजार व शेती विभागाच्या तुलनेत वाहतूक विभागातील परिस्थिती चांगली आहे. हंगामी बेकारी हा प्रकार इथे सहसा आढळत नाही. दैनंदिन कामाचा विचार करता महिन्यातील ७-८ दिवस काम मिळू शकत नाही. अपवादात्मक काही ठिकाणच्या हमालांना महिन्यातील १० ते १५ दिवस काम मिळू शकत नाही.

थोडक्यात, हंगामी बेकारीची समस्या कृषी-उत्पन्न-विनिमय विभागामध्ये गंभीरपणे जाणवते. धान्यबाजारामध्ये तुलनेत समस्येची तीव्रता कमी आहे. वाहतूक विभागात मात्र हंगामी बेकारीचा प्रश्न नाही. परंतु हमालांच्या मुलाखतीमधून स्पष्ट होते की, रोजच्या रोज काम उपलब्ध होत असले तरी त्याचे प्रमाण निश्चित नाही.

[क] नेमणूक :

"महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण]" कायदा १९६९ अंमलात आल्यापासून

हमाल नेमणुकीबाबतच्या नियमांचे पालन व्यापारी व मालक यांना करावे लागते. प्रथम व्यापारी व मालक यांना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे नाव नोंदणी करावी लागते. नंतर व्यापारी अथवा मालक एखादया हमालास नेमून घेतल्यास प्रथम माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे नोंद करतात. कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे ८४५ व्यापारी व मालकांनी नोंद केली आहे. त्यांची विभागणी पुढील प्रमाणे - वाहतूक विभाग - १४८, कृषि-उत्पन्न-विनिमय विभाग - ३५१, धान्यबाजार विभाग - ३४६ या ८४५ व्यापारी व मालक यांनी कामावर घेतलेल्या हमालांची नोंद कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे केली आहे. एकूण नोंदणी झालेले हमाल २५४८ असून त्यांचे विभागणी पुढील प्रमाणे - वाहतूक - ९३९, कृषि-उत्पन्न-विनिमय विभाग - ८४३ व धान्यबाजार विभाग - ७६६ या नोंदणी झालेल्या हमालांपैकी एखादया हमालाला कामावरून कमी करण्याबाबतचा निर्णय व्यापारी, मालक यांना परस्पर घेता येत नाही. हमालाला कामावरून कमी करताना मंडळाची संमती घ्यावी लागते. तसेच संबंधित हमाल संघटनेला कळवावे लागते. माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाच्या स्थापनेनंतर कंत्राटदार आणि हुंडेकऱ्यांचा हस्तक्षेप कमी झाला आहे.

[ड] <u>व्यवसाय अनुभव :</u>

हमाली व्यवसायामध्ये सर्व जातीचे हमाल आढळतात. भारतातील ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तन घडून येत असले तरी जातिव्यवस्थेवर आधारीत समाजव्यवस्थेचा पूर्ण कायापालट घडून आलेला नाही.

जातिव्यवस्थेवर आधारलेली बलुतेदारी मोडकळीस आली असली तरी रोटी - बेटीच्या व्यवहाराबाबतचे निकष हे आजसुद्धा जातिव्यवस्थेवर आधारलेले आहेत. यासंदर्भात ग्रामीण भागातून शहरामध्ये आलेल्या विविध जातीच्या हमालांमध्ये परस्परसंबंध कशा प्रकारचे आहेत, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. एकूण हमालांमध्ये दलित अथवा अनुसूचित जातीच्या हमालांचे प्रमाण ८ टक्के आहे. दलित तसेच इतर जातीतील हमालांच्या मुलाखतीमधून असे स्पष्ट होते की, मूळ गावी जरी जातिभेद पाळला जात असला तरी हमालीमध्ये आल्यानंतर त्यांनी जातीभेद सोडून दिला आहे. दलित हमालांच्या मुलाखतीमधून असे स्पष्ट होते की सर्व हमाल एकत्र काम करतात, जेवण एकत्र घेतात. व्यापारी, मालक यांच्याकडून दलित म्हणून विषमतेची वागणूक मिळत नाही. अपवादात्मक एका दलित हमालाच्या मुलाखतीमधून जातिभेद पाळला जात असल्याचे स्पष्ट झाले. दलित हमाल व इतर जातीतील सहकारी एकत्र काम करतात. व्यापारी, मालक समान वागणूक देतात परंतु जेवण मात्र अलग घेतले जाते. केवळ हे एक अपवादात्मक उदाहरण सोडल्यास हमाली व्यवसायामध्ये जातिभेद दिसून येत नाही.

माथाडी आणिअसंरक्षित कामगार मंडळ व हमाल संघटना यांच्याबाबत हमालांचा अनुभव लक्षात घेता हमालांच्या प्रतिक्रिया संमिश्र आहेत. एकूण हमालांपैकी ८ टक्के हमाल कुठल्याच संघटनेचे सभासद नाहीत. तसेच संघटना सदस्य असणाऱ्यांपैकी सुद्धा निम्म्या हमालांना संघटनेचे कार्य माहित नाही. इतर हमालांनी मात्र संघटना हमालांच्या हक्कासाठी जागरूक असते असे मत प्रतिपादन केले. परंतु स्थानिक संघटनांपेक्षा डॉ. बाबा आढावांना अधिक श्रेय दिले जाते. माथाडी

मंडळामध्ये हमालांचे वेतन जमा होते, त्यामुळे वेतन कपातीची समस्या सुटली आहे, असे दिसून येते. अपवादात्मक काही हमालांच्या मात्र वेतनकपातीविषयी तक्रारी आढळल्या. तसेच वेतन देणे यापेक्षा वेगळी जबाबदारी अथवा भूमिका मंडळाने पार पाडली नाही, असे हमालांचे मत आहे.

[इ] व्यापारी, मालक यांची वागणूक :

व्यापारी व मालक यांची वागणूक कायदयाप्रमाणे असते का हे हमालांच्या मुलाखतीमधून जाणून घेण्याचा प्रयत्न केला. याबाबत हमालांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया आढळते. तसेच त्यांच्या प्रतिक्रिया विभाग--वार वेगवेगळ्या दिसून येतात. वाहतूक विभागामधील हमालांना दिली जाणारी वागणूक ही कायदयानुसार असते, असे वाहतूक विभागातील हमालांचे मत पडते. परंतु धान्यबाजार व कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील हमालांच्या वेतन व कामाबाबत अनेक समस्या आहेत, दोन्ही विभागामधून महत्वाची समस्या म्हणजे बाहेरच्या व्यापाऱ्याने माल खरेदी केल्यानंतर तो व्यापारी स्वत:चे हमाल वापरतो. अशावेळी हमाली वाचविण्यासाठी असे व्यापारी कमी हमाल वापरतात. मालकांच्या दडपणामुळे अशा हमालांना पोती उचलू लागण्यास, पालट करण्यास मदत करावी लागते. परंतु हे काम नगण्य मानून त्यांना हमाली दिली जात नाही. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागामधील हमालांचा व्यवसाय अनुभव व समस्या ह्या गंभीर आहेत. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील हमालांना आलेला माल उतरविण्याचे व वाहनामध्ये चढविण्याची मजूरी

मिळते. परंतु बरीचशी कामे ही विना वेतन करावी लागतात. सौदा आणि वतभर ही कामे हमालांना विनावेतन करावी लागतात. दुकानामध्ये अथवा गुदामामध्ये आलेला माल व्यापारी तपासून पाहतात. यासाठी पोत्यातील माल जमिनीवर पसरुन पुन्हा पोत्यात भरला जातो. पोत्याला शिवण करुन ही पोती थप्पीला लावावी लागतात. याला वतभर किंवा सौदा असे म्हणतात. तसेच, बाहेरच्या व्यापाऱ्याला माल विकतानासुद्धा ही कामे करावी लागतात. परंतु या कामाचे वेतन हमालांना मिळत नाही. तसेच बहुतांशी दुकानांमधून ओतलेला माल भरण्यासाठी वेगळे मजूर आहेत. परंतु काही व्यापारी ही मजुरी वाचविण्यासाठी वेगळा कामगार अथवा मजूर ठेवत नाहीत. त्यामुळे कृषि-उत्पन्न-विनिमय(शेती) विभागातील हमालांचे बरेचसे काम हे विनावेतन असते.

व्यापाऱ्यांचे कामाबाबतचे दडपण आणि करावी लागणारी इतर कामे याबाबत हमालांच्या प्रतिक्रिया संमिश्र आहेत. कामाबाबत मालकाचे दडपण नसते, अशी साधारण प्रतिक्रिया आढळते. परंतु अस्तित्वात असलेले नियम अपुरे, कमी काम इ. कारणामुळे हमाल पडेल ते काम करतात. त्यामुळे वेळेच्या बंधनाचे पालन व्यापाऱ्यांकडून होत नाही. कामाच्या वेळी हमालांच्या अडीअडचणी समजून घेतला जात नाहीत. हमालांना कराव्या लागणाऱ्या इतर कामाबाबत सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, ज्या ठिकाणी हमाल मोठया प्रमाणात आहेत त्याठिकाणी हमालांना घरकाम अथवा इतर कामे करावी लागत नाहीत. परंतु, ज्या ठिकाणी हमाल संख्येने कमी किंवा एकच आहे, अशा ठिकाणी झाड-लोट, कार्यालयाची स्वच्छता, बँक व टपाल व्यवहारातील किरकोळ कामे करावी लागतात. त्याबद्दल, हमालांना मोबदला मिळत नाही,

असे हमाल सर्वसाधारण २० टक्के आढळले.

अशा प्रकारे व्यवसायातील अनुभवाबाबत हमालांच्या प्रतिक्रिया संमिश्र आढळतात.

४. <u>हमालांचे मासिक उत्पन्न :</u>

हमालांच्या कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न अत्यंत कमी असते. आर्थिक विवंचनेमुळेच हमाली व्यवसायामध्ये ते प्रवेश करतात. हमाली व्यवसायातील त्यांच्या मासिक उत्पन्नाचा आढावा घेतल्यास त्यांच्या पूर्व आर्थिक परिस्थितीत व्यवसाय स्वीकारल्यानंतर झालेला बदल लक्षात येऊ शकेल. या उद्देशानेच हमालांचे व्यवसायातील मासिक उत्पन्न, दर दिवसाचे उत्पन्न, तसेच त्यांच्या मधील मासिक बचतीचे प्रमाण इत्यादी बाबी समजून घेतल्या आहेत. मासिक उत्पन्नाचे विश्लेषण सारणी क्र.४ दर्शविते.

सारणी क्र. ४ - प्रतिसादकांचे हमाली व्यवसायातील मासिक उत्पन्नानुसार वर्गीकरण

| विभाग | ४०० ते ६०० पर्यंत | ६०१ ते ८०० पर्यंत | ८०१ ते १००० पर्यंत | १००१ ते १२०० पर्यंत | १२०१ ते १४०० पर्यंत | १४०१ ते १६०० पर्यंत | १६०१ ते १८०० पर्यंत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहतूक | १० [२२.२२%] | ५ [११.११%] | ७ [१५.५५%] | २ [४.४४%] | - | १६ [३५.५५%] | ५ [११.११%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न-विनिमय | ५ [११.९०%] | ७ [१६.६६%] | २५ [५९.५२%] | ४ [९.५२%] | १ [२.२२%] | - | - | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | ६ [१३.३३%] | ८ [२१.०५%] | ११ [२८.९४%] | ११ [२८.९४%] | २ [५.२६%] | - | - | ३८ [१००%] |
| एकूण | २१ [१६.८%] | २० [१६%] | ४३ [३४.४%] | १७ [१३.६%] | ३ [२.४%] | १६ [१२.८%] | ५ [४%] | १२५ [१००%] |

पाहणी अंती असे दिसून येते की, बहुतांशी हमालांचे व्यवसायामधील उत्पन्न कमी आहे. मासिक उत्पन्न गटानुसार, आढावा घेता असे दिसून येते की, ८०१ ते १०००रू. दरम्यान मासिक प्राप्ती असणारे सर्वाधिक म्हणजे ४३ [३४. ४ टक्के] होते. तसेच ४०१ ते ६०० रू. पर्यंत मासिक प्राप्ती असणारे २१ [१६. ८ टक्के] हमाल होते. मासिक उत्पन्नाचा तुलनात्मक व विभागवार आढाव्यानेपुढील गोष्टी स्पष्ट होतात. १००१ च्या पुढे मासिक कमाई असणारे हमाल केवळ ३२. ८ टक्के आढळले तर १००० रू. पेक्षा कमी मासिक उत्पन्न असणारे हमाल ६७. २ टक्के होते. तसेच वाहतूक विभागातील हमालांचे मासिक उत्पन्न धान्यबाजार व कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील हमालांच्या मासिक उत्पन्नाच्या तुलनेत चांगले आहे. वाहतूक विभागातील निम्म्या-हून अधिक हमालांचीमासिक कमाई १००० रू. च्या पुढे आहे. तसेच १४०० रू. हून अधिक उत्पन्न असणारे हमाल केवळ वाहतूक विभागामध्ये आढळते. त्यांचे एकूण हमालांशी प्रमाण २१ [१६. ८ टक्के] आहे. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागातील हमालांचे मासिक उत्पन्न वर दर्शवि-ल्याप्रमाणे असले तरी त्यांचे काम हंगामी स्वरूपाचे असते. वर्षातील केवळ ६-७ महिने काम उपलब्ध होते. गूळ विभागामध्ये ही समस्या प्रकर्षाने जाणवते.

मासिक उत्पन्नाप्रमाणेच हमालांची दिवसाची, आठवडयाची कमाई व बचतीचे प्रमाण या बाबी समजून घेता, हमालांकडून आठवडयाच्या प्राप्तीविषयी माहिती मिळू शकली नाही, कारण त्यांना वेतन महिना-अखेर मिळते. एक दिवसाच्या वेतनाबाबत माहिती मिळू शकली तरीही प्रमाण निश्चीत नाही. वाहतूक विभागामध्ये कमीत कमी १५ ते २५ रू.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY ... 90/-

दिवसाची प्राप्ती असणारे हमाल आढळले. त्याप्रमाणेच काही हमालांची कमाई ५० ते ७० रू. इतकी होती. कृषि-उत्पन्न-विनिमय विभागामध्ये कमीत कमी २० ते २५ व जास्तीत जास्त ३० ते ५० रू. इतकी दिवसाची प्राप्ती होते. धान्यबाजार विभागामध्ये कमीत कमी २५ ते ३० रू. त्याप्रमाणेच जास्तीत जास्त ५० रू. दिवसाची प्राप्ती असणारे हमाल आढळले. धान्यबाजारामधील स्त्रियांच्या बाबतीत दिवसाचे वेतन याही पेक्षा कमी आढळते. धान्य बाजारातील स्त्रियांचे कमीत कमी १२ ते जास्तीत जास्त १७ रू. वेतन असल्याचे दिसून आले. हमालांचे मासिक उत्पन्न कमी असल्याने सर्व कमाई कौटुंबिक खर्च, व्यसन इ. वर खर्च होत असल्याने हमालांमध्ये बचतीचे प्रमाण कमी आढळते. पाहणीपैकी केवळ ५ [४ टक्के] हमालांनी महिना १०० रू. बचत करत असल्याचे सांगितले. यापैकी ३ हमाल वाहतूक विभागातले, तर २ धान्यबाजारमधील होते.

सारणी क्र.४ चे वरील विश्लेषण, हमालांचे दिवसाचे वेतन व बचतीचे प्रमाण पाहता हमालांचे उत्पन्न कमी असते हे स्पष्ट होते.

## ५. सुविधा व सवलती :

"महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण]" कायदयाचा मूळ उद्देश असंरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करणे हा आहे. अशा नियमनात कामाच्या ठिकाणी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आणि कामगारांचे कल्याण, आरोग्य यासाठी उपाय योजणे, नोकरीच्या अटी व शर्ती यासाठी अधिक चांगली तरतूद करणे, टाळता येणाऱ्या बेकारीस प्रतिबंधक उपाय योजणे इत्यादी उद्दिष्टांचा समावेश आहे. या उद्दिष्टांच्या

अनुषंगाने हमालांच्या मुलाखतीमधून वस्तुस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा थोडक्यात तपशील पुढील प्रमाणे -

[अ] दरवाढ व भविष्यनिर्वाहनिधी :

हमालांना मिळणारी दरवाढ ही तीन वर्षांनी मिळते. महागाईचा वाढता आलेख पाहता वाढती महागाई व दरवाढ यांचा कधीच मेळ बसू शकत नाही. दरवर्षी महागाईचा आलेख हा वाढत असतो. परंतु हमालांना दरवाढ ही तीन वर्षांनी मिळते. दिली जाणारी दरवाढ सुद्धा तीन वर्षातील महागाईवाढीचा दर लक्षात घेऊन दिली जात नाही. यामुळे वाढती महागाई व दरवाढ यामध्ये मोठी तफावत राहते.

हमालांचे काम शारीरिक कष्टाचे असलेने आयुष्याच्या उत्तरार्धात ते काम करू शकत नाहीत. त्यासाठी १९६९ च्या कायदयान्वये हमालांसाठी भविष्यनिर्वाहनिधीची सोय करण्यात आली आहे. हा भविष्यनिधी माथाडी व असंरक्षित कामगार मंडळामार्फत मिळतो. यासाठी प्रत्येक हमालाच्या मजुरीच्या ३० टक्के रक्कम व्यापाऱ्यांनी मंडळाकडे भरावयाची असते. परंतु भविष्यनिर्वाहनिधीबरोबर हमालांसाठी निवृत्तीवेतनाची सोय करण्यात आली नाही. वास्तविक पाहता हमालांना मिळणारे कमी काम, त्यामुळे वेतन कमी अशी परिस्थिती असलेने भविष्यनिर्वाहनिधी फारसा जमा होऊ शकत नाही. त्यासाठी निवृत्तीवेतनाची तरतूद आवश्यक आहे, परंतु तशी सोय नाही.

[ब] आजारी रजा व नुकसान भरपाई :

हमालांचे काम अवजड ओझी उचलण्याचे असल्याने प्रसंगी शारीरिक इजा अथवा अपघात होऊ शकतो. अशावेळी हमालाला नुकसान भरपाई मिळणे आवश्यक असते. कोल्हापूरमध्ये माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना झाल्यानंतर हमालांना नुकसान भरपाईची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही नुकसान भरपाई माथाडी व असंरक्षित कामगारमंडळामार्फत दिली जाते. हमालांना याबाबत प्रत्यक्ष विचारणा केल्यानंतर बहुतांशी हमालांना तरतुदीची माहिती आहे, असे दिसून आले. परंतु हमालांमध्ये या तरतुदीबाबत शाश्वती नाही. पाहणी केलेल्या हमालांमध्ये नुकसान पोहोचलेला एकही हमाल नसला तरी कार्यालयीन अटी, कामकाजाची पद्धती व दप्तरदिरंगाई यामुळे नुकसान-भरपाई मिळू शकत नाही अथवा संघर्षानेच मिळते, असा इतरांचा अनुभव हमालांच्या मुलाखतीमधून व्यक्त झाला. संघटित क्षेत्रामध्ये अपघात अथवा शारीरिक इजा झाल्यास नुकसान भरपाई मिळते तसेच अपघातानंतर विश्रांतीच्या काळातले वेतनसुद्धा मिळते. परंतु हमालांच्या बाबतीत अशा पगारी आजारी रजेची तरतूद नाही.

[क] प्रथमोपचार व स्वच्छतागृहांची सोय :

कामाच्या ठिकाणी कामगारांचे कल्याण व आरोग्य साधण्यासाठी योग्य त्या सुविधा संबंधित मालकांनी उपलब्ध करून द्याव्यात, ही अपेक्षा कायदयान्वये आहे. परंतु पाहणी अंती असे दिसून येते की या नियमांचे पालन व्यापारी व मालकवर्गाकडून होत नाही. काम करताना ब-याच वेळा किरकोळ स्वरूपाच्या शारीरिक इजा होण्याचा संभव असतो.

त्यावर तात्काळ प्राथमिक उपचार करणे आवश्यक असते. अन्यथा कामाच्या ठिकाणाच्या वातावरणाचा त्यावर परिणाम होऊ शकतो. परंतु पाहणी केलेल्या हमालांच्या एकाही दुकानांमध्ये अथवा गुदामांमध्ये किंवा कामाच्या ठिकाणी प्रथमोपचाराची सोय नाही.

हमालांचे दुपारचे जेवण कामाच्या ठिकाणी होते. परंतु त्यासाठी हमालांना वेगळी व्यवस्था नाही. गुदामामध्येच अथवा उघड्यावर त्यांना जेवण घ्यावे लागते. तसेच संडास व बाथरूमची सोयसुद्धा अपवादात्मक काही ठिकाणी सोडल्यास कोठेही नाही. पिण्याच्या पाण्याची सोय मात्र बहुतांशी सर्वत्र आढळते.

[ड] कामाचे नियमन :

कायदयामध्ये कामाच्या शाश्वतीची तरतूद नसलेने नियमाप्रमाणे काम अशक्य असते. मिळेल ते काम करणे यालाच बहुतांशी हमाल महत्व देतात. प्रत्येक हमालाच्या मजुरीच्या ३० टक्के रक्कम मालकांनी मंडळाकडे भरावयाची असते. परंतु याचे पालन होतेच असे नाही. ब-याचवेळा गुदामातील माल बाहेरच्या व्यापा-याने खरेदी केल्यास तो स्वत:चे हमाल वापरतो अथवा मूळ गुदामातील हमालांना काम दिल्यास हमाली रोख स्वरूपात दिली जाते. यामुळे बाहेर जाणा-या मालावरील मजूरीमधून ३० टक्के रक्कम लेव्ही स्वरूपात मंडळाकडे जमा होऊ शकत नाही. हे हमालांचे आर्थिक नुकसानच होय. तसेच कायदयानुसार एकाच विभागात एकाच प्रकारचे काम करणा-या हमालांचे वेतन समान असावे. पाहणीमध्ये असे दिसून येते की, धान्यबाजारमध्ये हमाली करणा-या स्त्रियांचे वेतन समान नाही. धान्यबाजारमध्ये पाच स्त्रिया असून त्या एकत्र काम करतात. त्यांचे कामही

एकाच स्वरूपाचे आहे, तरी कामानुसार वेतन न देता कामातील एकूण कालावधीनुसार त्यांचे कमी-जास्त वेतन ठरविले आहे. त्यामुळे असमान अल्प वेतनावर त्यांना राबावे लागते.

६. व्यसन :

हमालांमध्ये व्यसनाधीन हमाल अधिक असतात. शारीरिक ताण कमी करण्यासाठी ते दारूचा अथवा अन्य व्यसनाचा आधार घेतात. या अनुषंगाने हमालांमधील व्यसनाधीनतेची समस्या समजून घेण्याचा प्रयत्न केला. सारणी क्र.५ हमालांमधील व्यसनानुसार वर्गीकरणाचा निर्देश करते.

सारणी क्र. ५ - प्रतिसादकांचे व्यसनानुसार वर्गीकरण

| विभाग | निर्व्यसनी | | तंबाखू/बिडी-सिगारेट | | मद्यपान | जुगार | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | | | |
| वाहतूक | - | ६ [१३.३३%] | - | ३९ [८६.६६%] | २३ [५१.११%] | १ [२.२२%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न विनिमय विभाग | २ [४.७६%] | २ [४.७६%] | १ [२.३८%] | ३७ [८८.०९%] | २० [४७.६१%] | - | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | ५ [१३.१५%] | २ [५.२६%] | - | ३१ [८१.५७%] | १७ [४४.७३%] | - | ३८ [१००%] |
| एकूण | १७ [१३.६%] | | १०८ [८६.४%] | | ६० [४८%] | १ [०.८%] | १२५ [१००%] |

हमालांमधील व्यसनाधीनतेची पाहणी करता, हमालांमध्ये व्यसन करणाऱ्या हमालांची संख्या अधिक आढळते. व्यसन करणाऱ्या हमालांचे प्रमाण अधिक असले तरी निर्व्यसनी हमालसुद्धा आढळून आले. एकूण हमालांपैकी १७ [१३.६ टक्के] हमाल निर्व्यसनी आहेत. यात ७ स्त्रियांचा समावेश आहे. तर व्यसन करणारे हमाल १०८ [८६.४ टक्के] आढळते. हे सर्वच हमाल तंबाखू अथवा विडी, सिगारेट इत्यादींचे व्यसन करतात. यामध्ये एका स्त्रीचा समावेश होतो. या व्यसनावर रोजी त्यांचे १-२ रुपये खर्च होतात. मद्यपान करणारे हमाल ६० होते. यापैकी निम्मे हमाल रोज दारू घेतात. इतर आठवड्यातून एक-दोनदा मद्यपान करतात. मद्यपानावर रोजी किमान ७ ते कमाल २० रु. खर्च होतो, असे मुलाखतीमधून व्यक्त होते. परंतु याबाबत निश्चित खर्च सांगता येत नाही. कांद्याचा व खतांचा विनिमय ज्या ठिकाणी होतो तेथील हमालांमध्ये दारूचे व्यसन अधिक आढळते. कुजके कांदे व खतांची दुर्गंधी यामुळे काम करणे अशक्य होते, दारू घेण्याशिवाय पर्याय नसतो, असे हमालांचे मत होते. दारूचे व्यसन करणारे हमाल इतक्या प्रमाणात आढळले तरी दारूमुळे वाया गेलेले हमाल आढळले नाहीत. वरील व्यसनां-प्रमाणेच जुगार व वेश्यागमन यासंदर्भातसुद्धा माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु माहिती मिळू शकली नाही.

## ७. कौटुंबिक जीवन :

हमालांच्या कौटुंबिक जीवनाच्या अभ्यासाखेरीज हमालांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचा अभ्यास परिपूर्ण होऊ शकत नाही. हमालांचा वैवाहिक दर्जा, कुटुंबामधील एकूण स्थिरता, अपत्यप्रमाण,

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मुलांचे शिक्षण, निवासव्यवस्था इ. बाबीविषयीच्या माहितीमधून हमालांच्या कौटुंबिक जीवनाचे चित्र स्पष्ट होते. यासर्व घटकांचा आढावा पुढील प्रमाणे घेतला आहे.

[अ] वैवाहिक दर्जा :

हमाली व्यवसायामध्ये अविवाहित हमाल फारच थोडे आढळतात. सारणी क्र. ६ हमालांचे वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण दर्शविते.

सारणी क्र. ६ - प्रतिसादकांच्या वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण

| विभाग | अविवाहित | विवाहित | विधवा | घटस्फोटीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| वाहतूक | - | ४५<br>[१००%] | - | - | ४५<br>[१००%] |
| कृषी-उत्पन्न-विनिमय-विभाग | २<br>[४.७६%] | ३९<br>[९२.८५%] | १<br>[२.३८%] | - | ४२<br>[१००%] |
| धान्यबाजार | ३<br>[७.८९%] | ३४<br>[८९.४७%] | - | १<br>[२.६३%] | ३८<br>[१००%] |
| एकूण | ५<br>[४%] | ११८<br>[९४.४%] | १<br>[.४%] | १<br>[.८%] | १२५<br>[१००%] |

सारणी क्र. ६ चे विश्लेषण करता एकूण हमालांपैकी ११८ [९४.४ टक्के] हमाल विवाहित आढळून आले. ५ [४ टक्के] अविवाहित होते. हे हमाल १५ ते २० वयोगटातील आहेत. यामध्ये एका स्त्रीचा समावेश आहे. तसेच १ विधवा व १ घटस्फोटीत हमाल आढळले. हया स्त्रिया आहेत.

[ब] हमालांमधील अपत्य प्रमाण :

हमालांच्या कौटुंबिक जीवनाचा एक भाग म्हणून हमालांच्या कुटुंबाचे अपत्यानुसार प्रमाण अभ्यासले. पुढील सारणी क्र. ७ हमालांचे त्यांच्या अपत्यानुसार वर्गीकरण दर्शविते.

सारणी क्र. ७ - प्रतिसादकांचे त्यांच्या अपत्यानुसार वर्गीकरण

| विभाग | १ ते ३ अपत्य असलेली कुटुंबे | ४ ते ५ अपत्य असलेली कुटुंबे | ६ ते ९ अपत्य असलेली कुटुंबे | एकूण |
|---|---|---|---|---|
| वाहतूक | २८ [६८.२९%] | १२ [२९.२६%] | १ [२.४३%] | ४१ [१००%] |
| कृषि-उत्पन्न-विनिमय | २६ [७२.२२%] | ७ [१९.४४%] | ३ [८.३३%] | ३६ [१००%] |
| धान्यबाजार | २३ [७१.८७%] | ९ [२८.१२%] | | ३२ [१००%] |
| एकूण | ७७[७०.६३%] | २८[२५.६८%] | ४[३.६६%] | १०९[१००%] |

पाहणी केलेल्या हमालांपैकी १२० हमाल विवाहित असून ११ हमाल विनाअपत्य आहेत. इतर १०९ हमालांच्या कुटुंबामधील अपत्यांचे प्रमाण पाहता १ ते ३ अपत्ये असलेली कुटुंबे सर्वाधिक आढळली. त्यांचे प्रमाण ७७ [७०.६३ टक्के] होते. ६ ते ९ अपत्य असणारी कुटुंबे केवळ ४ [३.६६%] आढळली. थोडक्यात, शासनाच्या प्रमाणित कुटुंब आकृतीबंधाचा विचार करता हमालांची कुटुंबे मर्यादित आढळतात.

[ब] साक्षरता :

हमालांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आढळते. कारण त्यांना कुटुंबामधून शैक्षणिक पार्श्वभूमी लाभलेली नसते. हमालांच्या एकूण कुटुंबाचा सुद्धा आढावा घेता साक्षरतेचे प्रमाण कमीच जाणवते. सारणी क्र. ८ हमालांच्या कुटुंबामधील शिक्षण प्रसार दर्शविते.

सारणी क्र. ८ - प्रतिसादकांच्या कुटुंबाचे शैक्षणिक पार्श्वभूमीनुसार वर्गीकरण.

| विभाग | एकूण कुटुंबे | एकूण साक्षर कुटुंबे | एकूण निरक्षर कुटुंबे | एकूण प्रौढ सदस्य |
|---|---|---|---|---|
| वाहतूक | ४५<br>[ - ] | ११५<br>[६१.४९%] | ७२<br>[३८.५०%] | १८७<br>[१००%] |
| कृषी-उत्पन्न-विनिमय | ४२ | ११६<br>[४७.१५%] | १३०<br>[५२.८४%] | २४६<br>[१००%] |
| धान्यबाजार | ३८ | ८५<br>[३८.९९%] | १२९<br>[५९.१७%] | २१८<br>[१००%] |
| एकूण | १२५ | ३१६ [४८.८४%] | ३३१[५१.१५%] | ६४७[१००%] |

हमालांमध्ये निरक्षर हमालांचे प्रमाण ५६.८ टक्के होते. हमालांच्या कुटुंबाबातीत सुद्धा हीच परिस्थिती दिसून येते. हमालांच्या १२५ कुटुंबामधून ६४७ प्रौढ सदस्य होते. पैकी ३३१ [५१.१५ टक्के] सदस्य निरक्षर होते. तर ३१६ [४८.८४ टक्के] सदस्य साक्षर होते. निम्म्याहून अधिक कुटुंबे निरक्षर असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच हमालांच्यामध्ये शैक्षणिक मागासलेपणा मोठया प्रमाणात आहे. तसेच सदर विश्लेषणा-मध्ये दुसऱ्या पिढीतील साक्षर सदस्यांचासुद्धा समावेश आहे. त्यामुळे दुसऱ्या पिढीतील अथवा हमालांच्या अपत्यांमधील शैक्षणिक प्रसार अभ्यासणे तितकेच महत्वाचे ठरते.

[ड] <u>मुलांचे शिक्षण</u> :

हमालांच्यामध्ये अथवा त्यांच्या कुटुंबामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी दुसऱ्या पिढीमध्ये मात्र शिक्षणप्रसार झालेला दिसून येतो. परंतु शिक्षणप्रसाराखेरीज शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय नाही. सारणी क्र.९ हमालांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचे विश्लेषण करते.

सारणी क्र. ९ - प्रतिसादकांच्या मुलांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण

| विभाग | कुटुंबसंख्या | निरक्षर | ४थी पर्यंत | ५वी ते ७वी | ८वी ते १०वी | ११वी ते १२वी | पदवी शिक्षण | पदव्युत्तर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहतूक | ३३ | ४ | ४१ | १८ | १७ | ५ | ६९ | १ | ९२ |
| | | [४.३४%] | [४४.५६%] | [१९.५६%] | [१८.४७%] | [५.४३%] | [६.५२%] | [१.०८%] | [१००%] |
| कृषि-उत्पन्न- | ३२ | १५ | २८ | ३० | १८ | ५ | - | - | ९६ |
| विनिमय | | [१५.६२%] | [२९.१६%] | [३१.२५%] | [१८.७५%] | [५.२८%] | | | [१००%] |
| धान्यबाजार | २१ | ३ | २२ | १५ | ८ | १ | २ | - | ५१ |
| | | [५.८८%] | [४३.१३%] | [२९.४१%] | [१५.६८%] | [१.९६%] | [३.९२%] | | [१००%] |
| एकूण | ८६ | २२ | ९१ | ६३ | ४३ | ११ | ८ | १ | २३९ |
| | | [९.२०%] | [३८.०७%] | [२६.३५%] | [१७.९९%] | [४.६०%] | [३.३४%] | [.४१%] | [१००%] |

१२५ हमालांपैकी १२० हमाल विवाहित होते. पैकी ११ हमाल हे विनाअपत्य होते तर २३ हमालांची मुले ६ वर्षाखालील होती. इतर ८६ हमालांच्या कुटुंबातील २३९ मुले ही शाळेत जाण्यायोग्य वयाची होती. यापैकी २२ [९.२० टक्के] मुले निरक्षर होती, तर २१७ [९०.८० टक्के] मुले साक्षर होती. यावरून स्पष्ट होते की, हमालांच्या मुलांमध्ये साक्षरता प्रसार अथवा शिक्षणप्रसार घडून आला आहे. साक्षरतेचे प्रमाण ९०.८० टक्के असले तरी एकूण शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेता हमालांच्या मुलांचे शिक्षण फारसे झालेले नाही. शिक्षित २१७ मुलांपैकी केवळ एक पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. पदवी शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण ८ [३.३४ टक्के] आहे.

४थी पर्यंत शिक्षण झालेली मुले सर्वाधिक म्हणजे ८९१ [३८.०७] इतकी होती. वरीलप्रमाणे ९०.८० टक्के साक्षरता असली तरी शिक्षणामधील सातत्य हमालांच्या मुलांमध्ये टिकून राहतेच असे नाही. शाळागळतीचे प्रमाणही जास्त आहे. याबाबत पुढील सारणी क्र.१० हमालांच्या मुलांमधील शाळागळतीचे प्रमाण दाखविते.

...८३/-

UNIVERSITY ... LIBRARY

सारणी क्र. १० प्रतिसादकांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीनुसार वर्गीकरण

| विभाग | शाळा मध्येच सोडलेल्या मुलांची संख्या | शाळेत जाणा-या मुलांची संख्या | एकूण साधर |
|---|---|---|---|
| वाहतूक | २६ [२९.५४%] | ६२ [७०.४५%] | ८८[१००%] |
| कृषि-उत्पन्न-विनिमय | २२ [२७.१६%] | ५९ [७२.८३%] | ८१[१००%] |
| धान्यबाजार | ११ [२२.९१%] | ३७ [७७.०८%] | ४८[१००%] |
| एकूण | ५९ [२७.१८%] | १५८ [७२.८१%] | २१७[१००%] |

वरील सारणीवरून दिसून येते की, एकूण २१७ मुलांपैकी ५९ [२७.१८ %] मुलांनी शाळा मध्येच सोडली आहे. तर शाळेत जाणा-या मुलांचे प्रमाण १५८ [७२.८१ टक्के] आहे. परंतु प्रस्तुत माहितीच्या आधारे निश्चित निष्कर्ष, अनुमान काढता येत नाही. कारण बहुतांश मुलांनी प्राथमिक शिक्षण चालू असतानाच शाळा सोडलेली आहे, तसेच शाळेत जाणा-या १५८ मुलांपैकी अधिकांश मुले प्राथमिक शिक्षण घेत आहेत. पुढील शिक्षण घेणा-या मुलांचे प्रमाण कमी आहे.

...८४/-

निरक्षरता आणि शाळा गळतीचीकारणे :

हमालांशी चर्चा करता मुलांमधील निरक्षरता आणि शाळा गळतीची पुढील कारणे स्पष्ट होतात.

[१] स्त्री-शिक्षणाबद्दल अनास्था - ग्रामीण भागामध्ये एकूणाच शिक्षणप्रसार मंदगतीने होत आहे. स्त्री शिक्षणाची गोष्ट तर दूरच. स्त्री शिक्षणाबद्दल असलेली अनास्था हे निरक्षरतेचे व शाळा गळतीचे एक प्रमुख कारण आहे. पाहणी केलेल्या एकूण २२ निरक्षरांपैकी १६ मुली आहेत, तसेच शाळा मध्येच सोडण्याऱ्या ४९ पैकी २० मुली आहेत.

[२] आर्थिक परिस्थिती :- हमालांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाजूक असते. त्यामुळे मुलांचा शैक्षणिक खर्च परवडू शकत नाही. तसेच मुलांना शाळेत घालण्यापेक्षा घरकाम अथवा शेतीकामात गुंतवीणे हमालांना किफायतशीर वाटते.

[३] शिक्षणाबद्दल अनास्था :- हमाल स्वत: निरक्षर असल्याने त्यांच्या मुलांमध्ये सुद्धा निरक्षरता अथवा शाळागळतीचे प्रमाण जास्त आहे. कारण शिक्षणाबद्दल त्यांच्यामध्ये अनास्था असते. तसेच हमाल दिवसभर हमाली कामामध्ये गुंतल्याने मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊ शकत नाहीत, किंबहुना कामामुळे दुर्लक्ष होते.

[४] शैक्षणिक सुविधांचा अभाव - हमालांचे मूळ वास्तव्य ग्रामीण भागामध्ये असते. पाहणी केलेल्या हमलापैकी ६९ [५५.२ टक्के] हमालांचे कुटूंब हे मूळ गावी आहे. मूळ गावी पुढील शिक्षणाची सोय नसलेने मुलांची शाळा मध्येच थांबवावी लागते. तसेच घराशेजारचे वातावरण शिक्षणाला पोषक क नसलेने सुद्धा मुलांमध्ये शिक्षणाची प्रगती कमी आहे.

[ड] निवासस्थान :- रोजगाराच्या निमित्ताने स्थलांतरीत झालेल्या लोकांपुढे निवासस्थानाचा प्रश्न गंभीर असतो. अपुरे वेतन, कामाची अनिश्चिती आणि जागेची टंचाई यामुळे कामाच्या ठिकाणी कामगारांची अथवा हमालांची निवासस्थानाची व्यवस्था ही मोठी समस्या असते. त्यामुळे बहुतांशी हमाल कामाच्या ठिकाणीच गुदामामध्ये एकटे राहतात. अथवा भाडयाच्या घरात राहतात. पुढील सारणी क्र.११ वरून हमालांच्या कोल्हापूरमधील निवास व्यवस्थेची कल्पना येते.

...८६/-

सारणी क्र. ११ - प्रतिसादकांच्या कोल्हापूरमधील निवासस्थानानुसार वर्गीकरण.

| विभाग | भाडोत्री घर | मालकीचे घर | कामाच्या ठिकाणी | एकूण |
|---|---|---|---|---|
| वाहतूक | २५ [[५५. ५५%] | ६ [१३. ३३%] | १४ [३१. ११%] | ४५ [१००%] |
| कृषि-उत्पन्न-विनिमय | ६ [१४. २९%] | २ [४. ७६%] | ३४ [८०. ४७%] | ४२ [१००%] |
| धान्यबाजार | १७ [४४. ७३%] | - [ - ] | २१ [५५. २६%] | ३८ [१००%] |
| एकूण | ४८ [३८. ४%] | ८ [६%] | ६९ [५५. २%] | १२५ [१००%] |

१२५ हमालांपैकी ४८ हमाल [३८. ४ टक्के] भाडोत्री घरामध्ये राहतात. पाहणीमध्ये असे दिसून आले की, भाडोत्री घरात राहणारे बहुतांशी हमाल कोल्हापूर शहरामधील विक्रमनगर, राजेंद्रनगर या परिसरात राहतात. हया परिसरामध्ये झोपडपट्टयांचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे बहुतांशी हमालांची भाडोत्री घरे झोपडीवजा कच्च्या मातीची आहेत. तर ८ [६ टक्के] हमालांनी जागा घेऊन स्वत:ची घरे बांधली आहेत. उरलेले ६९ [५५. २ टक्के] हमाल कामाच्या ठिकाणी मालकाच्या आश्रयाने गाळयावर अथवा दुकानात मिळेल त्या जागेत राहतात. अशा

ठिकाणी संडास बाथरूमची सोय नाही. हया ६९ हमालांचे कुटुंब मूळ गावी आहे.

निवासस्थानानुसार वर्गीकरणाचा विभागवार आढावा घेता, कोल्हापूरमध्ये कुटुंबासहित राहणा-या हमालांमध्ये वाहतूक विभागातील हमालांचे प्रमाण अधिक आहे. वाहतूक विभागातील एकूण हमालांपैकी ३१ हमाल कोल्हापूरमध्ये कुटुंबासहित राहतात, तर शेती विभागातील हमालांमध्ये कोल्हापूरमध्ये कुटुंबासहित राहणा-यांची संख्या कमी आहे. कृषि-उत्पन्न-विनिमय (शेती) विभागातील एकूण हमालांपैकी ८ हमालांनी कोल्हापूरमध्ये कुटुंबासहित वास्तव्य केले आहे. याचे कारण कृषि-उत्पन्न-विनिमय- [शेती] विभागात कामाची कमी उपलब्धता असलेने कुटुंबासहित राहणे हमालांना परवडत नाही. तसेच एकूण हमालांमध्ये मालकीचे घर असणारे हमाल वाहतूक विभागामधील अधिक आहेत. यावरून स्पष्ट होते की, वाहतूक विभागामध्ये शेती विभाग व धान्यविभागाच्या तुलनेत कामाची व वेतनाची अधिक शाश्वती जाणवते.

सारांश, हमाली व्यवसायाचे स्वरूप निश्चितपणे स्पष्ट करता येत नाही. काम व वेतन यांची अशाश्वतता, वेळेची अनिश्चिती यामुळे हमाली कामामध्ये अस्थिरता अधिक असते. तरीसुद्धा आर्थिक दुरावस्था, दुष्काळ व भांडवलाचा अभाव यामुळे ग्रामीण भागातील लोक हमाली व्यवसायामध्ये येतात. मूळच्या आर्थिक परिस्थितीत हमालीमुळे फरक पडतो. परंतु, चालू आर्थिक व्यवहारामध्ये मात्र त्यांचे आर्थिक उत्पन्न अपुरे पडते.